कार्यालय
प्रकल्प अधिकारी
एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, औरंगाबाद
आझाद चौक ते टि.व्ही.सेंटर रोड सेक्टर नंबर D-१ ओरीएंस टॉवर बिल्डींग सिडको, एन-८ औरंगाबाद
दुरध्वनी व फॅक्स नं. ०२४०/२४८६०६९ E-MAIL-poitdp.abd-mh@gov.in

## जिल्हा निवड समिती, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, औरंगाबाद
## (जाहिरात क्रमांक १/२०१९)
## कंत्राटी संगणक शिक्षक/निर्देशक (११ महिन्यांच्या कराराने) भरावयाच्या पदभरतीची जाहिरात

महाराष्ट्र शासन, आदिवासी विकास विभाग, शानिक्र. शाआशा-२०१८/प्र.क्र.४८९/का.१३ दि.१५ डिसेंबर, २०१८ अन्वये निर्गमीत केलेल्या मार्गदर्शक सुचनांनुसार प्रकल्प अधिकारी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प औरंगाबाद कार्यालयाच्या अधिनस्त असलेल्या शासकीय आश्रमशाळांच्या ठिकाणी कंत्राटी पध्दतीने संगणक शिक्षक/निर्देशक या ०८ पदांसाठी ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहे. या पदासाठी खालील अटी व अर्हताची पुर्तता करणारे उमेदवार अर्ज करु शकतात.

| | |
|---|---|
| १. | उपलब्ध् संख्या :- ०८ |
| २. | मानधन:- रु.२००००/- (रुपये वीस हजार मात्र) एकत्रित (या व्यतिरिक्त कोणतेही भत्ते लागु होणार नाही.) |
| ३. | **पात्रता** |
| ३.१ | उमेदवार महाराष्ट्राचा रहिवासी असावा. |
| ३.२ | १. उमेदवाराचे वय १८ वर्षापेक्षा कमी व ४५ वर्षापेक्षा जास्त नसावे. |
| | २. उमेदवाराचे वय दिनांक ०१.०४.२०१९ रोजीचे वय विचारात घेण्यात येईल. |
| ३.३ | शैक्षणिक अर्हता व अनुभव |
| | १. B.Sc.(CS/IT) किंवा B.C.A. किंवा B.E.(computer) किंवा B.Tech. Computer किंवा तत्सम पदवी |
| | २. (M.C.A./M.Sc. in computer/ IT) व अनुभवी उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल. |
| | 3. ज्या जिल्हयात शाळा असेल त्या जिल्हयातील स्थानिक उमेदवारांना प्राधान्य देण्यात येईल. |
| ४. | प्रस्तुत जाहिरातीमध्ये नमुद केलेली शैक्षणिक अर्हता, अनुभव इत्यादी किमान असुन किमान अर्हताधारक धारण केलेली आहे म्हणुन उमेदवार मुलाखतीस बोलाविण्याकरिता पात्र असणार नाही. जाहिरातीस अनुसरुन प्राप्त झालेल्या अर्जाची संख्या वाजवी प्रमाणापेक्षा जास्त असेल आणि अर्ज सादर केलेल्या सर्व उमेदवारांच्या मुलाखती घेणे सोईस्कर नसल्यास मुलाखतीसाठी उमेदवारांची संख्या मर्यादीत करण्याच्या दृष्टीने जाहिरातीत दिलेल्या शैक्षणिक अर्हता आणि/अथवा अनुभव यापेक्षा जादा शैक्षणिक अर्हता/अनुभव यांच्या आधारे निकष निश्चित करुन अथवा चाळणी परीक्षेद्वारे मुलाखतीस पात्र उमेदवारांची संख्या मर्यादीत करण्यात येईल्. चाळणी परिक्षेचा अभ्यासक्रम, परिक्षेचे माध्यम व इतर बाबी कार्याल्याचे वेबसाईटवर व नोटीस बोर्डवर प्रसिध्द करण्यात येतील. प्रस्तुत जाहिरातीमध्ये भरतीसंदर्भातील संक्षिप्त तपशील दिलेला आहे. अर्ज करण्याची पध्दत, आवश्यक अर्हता, वयोमर्यादा, शुल्क, निवडीची सर्वसाधारण प्रक्रिया इत्यादीबाबतच्या सविस्तर तपशिलासाठी कार्यालयाचे itdpaurangabad.org या वेबसाईटवर भेट द्यावी. |
| ५. | सदर पदावर नियुक्त करण्यात आलेल्या संगणक शिक्षक/निर्देशक यांना आश्रमशाळांच्या ठिकाणी निवासी राहुन काम करावे लागेल. |

| | |
|---|---|
| ६. | कर्तव्ये व जबाबदाऱ्या:- प्रस्तुत पदाच्या कर्तव्ये व जबाबदाऱ्या कार्यालयाचे itdpaurangabad.org वेबसाईटवर उपलब्ध आहेत. |
| ७. | शुल्क रु. ३१५/- |
| ८. | अर्ज करण्याची पध्दत:- |
| | अ) प्रस्तुत परीक्षेसाठी अर्ज फक्त ऑनलाईन पध्दतीने स्वीकारण्यात येतील. इतर कोणत्याही प्रकारे अर्ज स्विकारण्यात येणार नाही |
| | ब) पात्र उमेदवाराला वेब-बेस्ड (Web-based) ऑनलाईन अर्ज itdpaurangabad.org या वेबसाईटवर दिनांक ११.०३.२०१९ ते ०२.०४.२०१९ या कालावधीत सादर करणे आवश्यक राहील. |
| | क) ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करण्याच्या सविस्तर सूचना कार्यालयाच्या itdpaurangabad.org या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. |
| ९. | उमेदवाराने मुलाखतीच्यावेळी सर्व आवश्यक मुळ कागदपत्रे सादर करणे आवश्यक आहे. सदर मुळ प्रमापणपत्रे मुलाखतीच्या वेळी सादर न केल्यास मुलाखत घेण्याचे नाकारले जाईल. याची कृपया नोंद घ्यावी. |
| १०. | पदाच्या निवडीसाठी अटी शर्ती |
| | १. सदर पदाची नेमणुक ही पूर्णत: कंत्राटी पध्दतीने असेल. |
| | २. या पदावरील उमेदवारास शासकीय कर्मचारी म्हणुन गणले जाणार नाही. |
| | ३. उमेदवाराने निवड झाल्यानंतर रु.१००/- च्या बंधपत्रावर करारनामा करणे बंधनकारक असेल. |
| | ४. पात्रता धारण न करणाऱ्या उमेदवारांना भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर अपात्र करण्याचे संपूर्ण अधिकारी जिल्हा निवड समिती, औरंगाबाद यांचे जवळ राखुन ठेवण्यात आले आहेत व याबाबत उमेदवारास कोणतीही तक्रार करता येणार नाही. |
| | ५. अर्ज स्विकारण्याच्या अंतिम दिनांकानंतर प्राप्त होणाऱ्या अर्जाचा विचार केला जाणार नाही याची उमेदवारांनी नोंद घ्यावी. |
| | ६. भरती प्रक्रिये दरम्यान एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, औरंगाबाद या कार्यालयास वेळोवेळी भेट देऊन भरती प्रक्रियेची माहिती बाबत अद्ययावत राहण्याची जबाबदारी उमेवाराची राहिल. |
| | ७. उमेदवार हा महाराष्ट्र राज्यातील रहिवासी असावा. (डोमेसाईल प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक) अर्जदाराने महाराष्ट्र राज्यातील रहिवासी असल्याचे शासनाचे प्राधिकृत केलेल्या सक्षम अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र आवश्यक आहे. |
| | ८. सामान्य प्रशासन विभागाकडील अधिसूचना क्र.एस.आर.व्ही.२०००/प्र.क्र.१७/२०००/१२ दिनांक २८ मार्च, २००५ व शासन परिपत्रक एस.आर.व्ही.-२०००/प्र.क्र.१७/२००० दिनांक ०१ जुलै, २००५ अन्वये विहित केलेनुसार लहान कुटूंबाचे प्रमाणपत्र नमुना "अ" अर्हता म्हणुन भरणे आवश्यक आहे. उमेदवार अविवाहीत असल्यास अर्जात याबाबत स्पष्ट उल्लेख करावा. |
| | ९. अर्ज केला अथवा विहीत अर्हता धारण केली म्हणजे लेखी परिक्षेस/कागदपत्र पडताळणीस बोलविण्याचा अथवा नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला असे नाही. निवडीच्या कोणत्याही टप्प्यावर अर्जदार विहीत अर्हता धारण न करणारा आढल्यास अथवा खोटी माहिती पुरविल्यास अथवा एखाद्या अर्जदाराने त्याच्या निवडीसाठी निवड समितीवर प्रत्यक्ष/अप्रत्यक्ष रित्या दबाव आणला अथवा गैरप्रकाराचा अवलंब केल्यास त्यास निवड प्रक्रियेतुन बाद करण्यात येईल. तसेच नियुक्ती झाली असल्यास कोणतीही पुर्व सुचना न देता त्यांची नियुक्ती समाप्त करण्यात येईल व त्यांच्यावर कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल. |
| | १०. चारित्र्य-पुर्वचारित्र्य पडताळणी अंती अक्षेपार्ह बाबी आढळुन आल्यास संबंधीत उमेदवार नियुक्ती साठी सेवेसाठी पात्र राहणार नाही. तसेच कोणत्याही टप्प्यावर असे उमेदवार अपात्र ठरतील. |

| | |
|---|---|
| | ११. निवड झालेल्या उमेदवारांना आवश्यक त्या सर्व प्रमाणपत्र/हमी पत्र इ. यांची पुर्तता करुन देणे आवश्यक राहिल . तसेच त्या प्रमाणपत्राची पडताळणी विहीत पध्दतीनुसार करुन घेणे बंधनकारक राहिल. |
| | १२. निवडणुक आचारसंहितेबाबत निश्चित कालावधी नसल्याने भरतीच्या वेळापत्रकात बदल झाल्यास या बाबत सुचना प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, औरंगाबाद या कार्यालयाच्या माहिती फलकावर व कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. उमेदवारांनी वेळोवेळी अवलोकन करावे. |
| | १३. अपरिहार्य कारणास्तव अथवा नैसर्गिक आपत्तीमुळे किंवा शासन आदेशाने विहीत दिनांकास मुलाखती घेणे शक्य नसेल तर शासन ठरवुन देईल त्याप्रमाणे सोईच्या दिवशी मुलाखतीस घेण्यात येईल. याबाबत वृत्तपत्राद्वारे/कार्यालयाच्या माहिती फलकाद्वारे/संकेतस्थळाद्वारे कळविण्यात येईल. |
| | १४. कागदपत्र पडताळणीस तसेच मुलाखतीस उमेदवारास स्वखर्चाने उपस्थि रहावे लागेल. वरील अटी व शर्ती नियमा व्यतिरिक्त शासनाने वेळोवेळी निर्गमीत केलेले आदेश व निर्णय लागू राहतील. |
| | १५. सदर भरती प्रक्रिये संदर्भात जिल्हा निवड समितीचा निर्णय अंतीम राहिल. |

स्वाक्षरीत/-

**ठिकाण:-औरंगाबाद**

दिनांक :- ०२ मार्च, २०१९

**(जी.एन.फुंडे)**
सदस्य सचिव तथा
प्रकल्प अधिकारी
एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प,
औरंगाबाद

# कंत्राटी संगणक शिक्षक/निर्देशक कर्तव्ये व जबाबदाऱ्या

१. इ.५ वी ते १० वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना संगणकाचे शिक्षण देणे.

२. ई-लर्निंग पध्दतीने विद्यार्थ्यांना शिकविण्यासाठी विषय शिक्षकांना तांत्रिक मदत करणे.

३. शालेय कार्यालयीन कामासाठी संगणकाशी संबंधित कामे करण्यासाठी  तांत्रिक व इतर मदत करणे (उदा. माहिती तयार करणे, शालार्थ व सरल, आर्थिक देयके इ.)

४. संगणक कक्षाच्या वापरावर सनियंत्रण करणे.

५. डिजीटल वर्ग वापराचे संनियंत्रण करणे.  अध्यापन सुकर, सहज, प्रभावी करण्यासाठी महाजाळ वर उपलब्ध संबंधित शैक्षणिक व्हिडीओ, साहित्य उपलब्ध करण्यासाठी व वर्गात प्रत्यक्ष दाखविण्यासाठी शिक्षकांना तांत्रिक मदत करणे

६. मुख्यालयी निवासी राहणे.

७. शाळेच्या प्रशासनात, व्यवस्थापनात गरज पडल्यास मदत करणे.

८. आश्रमशाळा संहिता व वेळोवेळी निर्गमित केलेले नियमांचे काटेकोरपणे पालन करणे.

९. मुख्याध्यापक व विषय शिक्षक यांना संगणक, महाजाल बाबतीत मदत करणे.

१०. अध्ययन अध्यापन प्रक्रिये संबंधित व शाळे संबंधित मुख्याध्यापकांनी सांगितलेली सर्व कामे.

११. निवड झाल्यावर रु.१००/- च्या बंधपत्रावर केलेल्या करारनाम्याचे काटेकोरपणे पालन करणे.

स्वाक्षरीत/-
**(जी.एन.फुंडे)**
सदस्य सचिव तथा
प्रकल्प अधिकारी
एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प,
औरंगाबाद

कार्यालय,
प्रकल्प अधिकारी,
एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, औरंगाबाद
आझाद चौक ते टि.व्ही. सेंटर रोड, सेक्टर नंबर D-१ ओरीएंस टॉवर बिल्डींग, सिडको एन-८, औरंगाबाद
दूरध्वनी व फॅक्स 0240-2486069 ई-मेल poitdp.abd-mh@gov.inवेबसाईटitdpaurangabad.org

जाहीरात मान्य दिनांक :- 02.03.2019

एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प औरंगाबाद या कार्यालयाच्या अंतर्गत येणा-या औरंगाबाद व बीड जिल्हयातील शासकीय आश्रमशाळेमध्ये कंत्राटी संगणक शिक्षक/निर्देशक (11 महिन्यांच्या कराराने) या पदाच्या पदभरतीसाठी ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहे. सदर पदासाठी अर्हताप्राप्त असलेले उमेदवार अर्ज करु शकतात.

| जाहिरात क्रमांक | विषय | एकुण पदसंख्या | शासकीय आश्रमशाळा वडनेर, नागद, ब्राम्हणी, तिसगांव, हटटी जि. औरंगाबाद | शासकीय आश्रमशाळा सुरुडी, शेडाळा, थेटेगव्हाण जि. बीड |
|---|---|---|---|---|
| 01 | कंत्राटी संगणक शिक्षक/निर्देशक | 08 | 05 | 03 |

2. प्रस्तुत जाहिरातीमध्ये भरती संदर्भातील संक्षिप्त तपशील दिलेला आहे. अर्ज करण्याची पध्दत, आवश्यक अर्हता, वयोमर्यादा, शुल्क, निवडीची सर्वसाधारण प्रक्रिया, इत्यादीबाबतच्या सविस्तर तपशीलासाठी कार्यालयाच्या itdpaurangabad.org या वेबसाईटवर उपलब्ध करुन देण्यात आलेल्या माहितीचे तसेच जाहिरातीचे कृपया अवलोकन करावे.
3. ऑनलाईन अर्ज itdpaurangabad.orgया वेबसाईटद्वारे दिनांक 11.03.2019 ते दिनांक 02.04.2019 या कालावधीत सादर करणे आवश्यक राहील.
4. कार्यालयाच्या itdpaurangabad.orgया वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात आलेली माहिती अधिकृत समजण्यात येईल.

ठिकाण :- औरंगाबाद
दिनांक :- 05 मार्च, 2019

स्वाक्षरीत/-
सदस्य सचिव तथा प्रकल्प अधिकारी,
एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प
औरंगाबाद